• वर्ष : ०३ • अंक : ३१५ • पुणे • गुरुवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक






# जनतेच्या हक्काचा बुलंद आवाज : नागेश चव्हाण

## शून्यातून उभारी घेत जनतेच्या विश्वासाचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व



**शब्दांकन : लक्ष्मण साबळे (निवासी संपादक)**

वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

(दै. आरंभ पर्व)

**संघर्ष, जिद्द आणि समाजसेवेची तळमळ या बळावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश अभिमन्यू चव्हाण यांचा वाढदिवस आज उत्साहात साजरा होत आहे.**

शेतकरी कुटुंबातून आलेल्या नागेश चव्हाण यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून स्वतःचा प्रवास घडवत पुण्यासारख्या स्पर्धात्मक शहरात उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सोलापूर जिल्हा रहिवासी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्याची सुरुवात करत त्यांनी तुळजाभवानी कार्स फॉर्म या उद्योगाची उभारणी केली. उद्योगासोबतच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देत त्यांनी मोठा जनाधार निर्माण केला.

छावा संघटना पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष तसेच राज्य सरचिटणीस म्हणून तसेच मानवाधिकार ह्यूमन राइट्स असोसिएशनमध्येही त्यांनी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष जबाबदारी सांभाळली. राजकीय क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून विधानसभा निवडणूक लढवली. पुढे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश करून जनतेच्या प्रश्नांसाठी काम करण्यास सुरुवात केली. माथाडी ,वाहतूक आघाडी प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

त्यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी त्यांच्यावर सोलापूर जिल्हा सरचिटणीस पदाची जबाबदारी सोपवली.

पद, प्रतिष्ठा आणि राजकीय जबाबदाऱ्या वाढत असतानाही नागेश चव्हाण यांनी समाजकारणाची नाळ कधीही तुटू दिली नाही.

शेतकऱ्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय असलेल्या जवळगाव मध्यम प्रकल्प दुरुस्ती व सुरक्षेच्या दृष्टीने ही व कालव्याच्याही दुरुस्तीसाठी त्यांनी शासन दरबारी प्रयत्न केले आहेत.

अवैध दारूविक्री, दारूबंदी, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, प्रशासनातील दुर्लक्ष अशा अनेक विषयांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. गरज पडल्यास आंदोलन, उपोषण यांसारख्या लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची त्यांची भूमिका कायम राहिली आहे. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात अन्नदान करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. तसेच आपल्या गावातील दत्त मंदिर उभारणीसह विविध धार्मिक, सामाजिक आणि विकासकामांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. "एक कॉल... प्रॉब्लेम सॉल्व" ही त्यांची कार्यशैली आज अनेकांच्या विश्वासाचे प्रतीक बनली आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी ते दिवस-रात्र उपलब्ध असतात. त्यामुळेच पंचक्रोशीत जनतेच्या हक्काचा आवाज म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ होत आहे.

वाढदिवसानिमित्त दैनिक आरंभपर्वशी संवाद साधताना नागेश चव्हाण म्हणाले, "सर्वसामान्य जनतेचे कल्याण हेच माझे ध्येय आहे. जनतेची कामे करून घेण्यासाठी अनेकदा आंदोलन, उपोषण यांसारखे मार्ग स्वीकारावे लागतात. जनहितासाठी आवश्यक असेल तर जलसमाधी किंवा आत्मदहनासारख्या तीव्र आंदोलनांचाही विचार करण्यास मी मागेपुढे पाहणार नाही. जनतेचे प्रश्न सुटले आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले, तर त्यापेक्षा मोठा आनंद दुसरा नाही. यापुढेही मी समाज आणि जनतेसाठी अखंड कार्यरत राहणार आहे." संघर्षातून घडलेले नेतृत्व, समाजसेवेची अखंड तळमळ आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढण्याची वृत्ती या गुणांमुळे नागेश चव्हाण हे आज जनतेच्या विश्वासाचे नेतृत्व म्हणून उदयास येत असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## कार्यकर्ता २४ तासांचा नव्हे, तर स्वाभिमानी आणि स्वावलंबी हवा!



(दै. आरंभ पर्व)

राजकारणात अनेकदा अशी अपेक्षा व्यक्त केली जाते की कार्यकर्त्याने चोवीस तास पक्षासाठी उपलब्ध असावे. ही अपेक्षा ऐकायला आकर्षक वाटत असली, तरी वास्तव यापेक्षा वेगळे आहे. कार्यकर्ता हा सर्वप्रथम एक सामान्य नागरिक असतो. त्यालाही कुटुंब असते, जबाबदाऱ्या असतात, व्यवसाय किंवा नोकरी असते. त्याच्या कष्टावरच त्याच्या घराची चूल पेटत असते. जर एखादा कार्यकर्ता २४ तास पक्षासाठीच काम करत राहिला, तर त्याचे घर कोण सांभाळणार? मुलांच्या शिक्षणाचा खर्च, आई-वडिलांच्या औषधांची व्यवस्था, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी कोण उचलणार? या प्रश्नांची ठोस उत्तरे बहुतांश राजकीय पक्षांकडे नसतात.

याउलट आमदार, खासदार आणि इतर लोकप्रतिनिधींना जनतेने पूर्णवेळ लोकसेवा करण्यासाठी निवडून दिलेले असते. त्यांना त्यासाठी वेतन, भत्ते आणि विविध शासकीय सुविधा उपलब्ध असतात. त्यामुळे त्यांच्याकडून चोवीस तास जनतेसाठी उपलब्ध राहण्याची अपेक्षा योग्य आणि स्वाभाविक आहे. मात्र, तीच अपेक्षा एका सामान्य कार्यकर्त्याकडून करणे न्याय्य ठरत नाही.

खरा कार्यकर्ता तोच, जो स्वतःच्या कष्टाने आपले अर्थकारण सक्षम ठेवतो आणि त्याचबरोबर वेळ काढून समाज व पक्षासाठी निःस्वार्थपणे काम करतो. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेला कार्यकर्ता कोणाच्याही दबावाखाली येत नाही. तो आपल्या विचारांशी, तत्त्वांशी आणि मूल्यांशी प्रामाणिक राहू शकतो.

परंतु जेव्हा कार्यकर्त्याच्या उपजीविकेची कोणतीही व्यवस्था नसते आणि त्याच्याकडून पूर्णवेळ राजकारणाची अपेक्षा केली जाते, तेव्हा राजकारण हेच उपजीविकेचे साधन बनण्याचा धोका निर्माण होतो. अशा परिस्थितीत तत्त्वांपेक्षा आर्थिक गरजांना प्राधान्य मिळण्याची शक्यता वाढते. त्याचा परिणाम केवळ त्या कार्यकर्त्यावरच नव्हे, तर संपूर्ण राजकीय संस्कृतीवर होतो.

म्हणूनच राजकीय पक्षांनी कार्यकर्त्यांकडे केवळ प्रचार करणारे किंवा गर्दी जमवणारे लोक म्हणून पाहू नये. त्यांच्या स्वाभिमानाचा, कुटुंबाचा आणि उपजीविकेचा आदर करावा. आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वाभिमानी आणि तत्त्वनिष्ठ कार्यकर्ताच कोणत्याही पक्षाची खरी ताकद असतो. राजकारणात व्यक्तिपूजा नव्हे, तर विचारांची निष्ठा आणि समाजसेवेची भावना टिकून राहिली पाहिजे. त्यासाठी कार्यकर्त्याला स्वतःचे जीवन सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे. कारण ज्याचे घर स्थिर आहे, तोच समाजासाठी आणि पक्षासाठी अधिक स्थिर, निःस्वार्थी आणि दीर्घकाळ काम करू शकतो. म्हणून कार्यकर्त्यांकडून २४ तासांच्या उपलब्धतेची अपेक्षा करण्यापेक्षा, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, स्वाभिमानी आणि सक्षम बनविण्याचे धोरण स्वीकारणे हीच खरी लोकशाही आणि सुदृढ राजकारणाची दिशा ठरेल.

**– डॉ. अनिकेत चंद्रकांत देशमुख नेते, शेतकरी कामगार पक्ष**

**(लेखक माजी आमदार स्व. गणपतराव देशमुख यांचे नातू आहेत, तसेच वैद्यकीय क्षेत्रातही कार्यरत आहेत)**



## प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन विविध गुणदर्शन तीन दिवसीय स्पर्धा पुण्यात

**जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व सृजनसभा यांच्यावतीने आयोजन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व सृजनसभा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 8 वा प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन विविध गुण्दर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २० ते २२ ऑगस्ट दरम्यान न-हे मानाजीनगर येथील संस्थेच्या संकुलात स्पर्धा होणार आहे. वक्तृत्व, लोकगीत गायन, वादविवाद, पथनाट्य, छोटा ख्याल गायन, नाटयगीत गायन व एकल तबला वादन या प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड.शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. युवा पिढीतील सुप्त कलागुणांना वाव देण्याकरीता आयोजित स्पर्धेचे उद्‌घाटन गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. उद्‌घाटनानंतर वक्तृत्व स्पर्धा होणार असून समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले, भारतीय संत परंपरा आणि समरसता, महाभारतातील स्त्रिया : व्यक्तित्व व कर्तृत्व असे विषय आहेत. तर, लोकगीत गायन स्पर्धेत अभंग, भारुड, पोवाडा सादरीकरण देखील याच दिवशी होणार आहे. तसेच स्व. आमदार रमेशभाऊ वांजळे निबंधलेखन स्पर्धा व कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर वक्तृत्व स्पर्धा ही १ ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आली आहे.

अ‍ॅड. शार्दुल जाधवर म्हणाले, वादविवाद व पथनाटय स्पर्धा शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० पासून सुरु होणार आहेत. वादविवाद स्पर्धेकरीता आर्टिफिशियल इंटेलिजन्स - मानवाचा मित्र की प्रतिस्पर्धी?, राजकारणात महत्व कशाला? पक्षनिष्ठा की व्यक्तिगत प्रगती? हे विषय असणार आहेत. तसेच पथनाटय स्पर्धेकरीता से नो टू ड्रग्ज घोषणेपलीकडील कृती या विषयावर सादरीकरण करण्याची मुभा स्पर्धकांना असणार आहे. तसेच, शनिवार, दिनांक २२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता छोटा ख्याल गायन, नाटयगीत गायन व एकल तबला वादन स्पर्धा होईल. सर्व स्पर्धा प्रकारांतील प्रथम विज्येत्याला १५ हजार ५५५ रुपये, द्वितीय क्रमांकाला ११ हजार १११ रुपये, तृतीय क्रमांकाला ७ हजार ७७७ रुपये व चषक आणि उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविणा-या रुपये ११११ व चषक प्रदान करण्यात येणार आहे. एकूण २ लाख ५० हजारहून अधिक रुपयांची पारितोषिके देण्यात येतील. स्पर्धेमध्ये पुण्यासह कोल्हापूर, कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आदी शहरांतील संघांनी सहभागी होणार असून नोंदणी सुरु आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवार, दिनांक २६ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात होणार आहे. स्पर्धेत सहभागाकरिता ७३५०५४४९०१, ९९२३५३७४३६, ७०८३७७४४१५ , ७३५०३४८४५८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### सुजय प्रतिष्ठानतर्फे आयुर्वेदिक तपासणी व सोहळ्याचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानासारख्या जीवनदायी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याच्या उद्देशाने सुजय प्रतिष्ठान, मैत्री रक्ताची यांच्या वतीने कै. सुजय सुरेश सकपाळ यांच्या १३ व्या स्मृतीप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिर, आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिर व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उद्यान मंगल कार्यालय, खजिना विहीर चौक, सदाशिव पेठ, पुणे येथे संपन्न होणार आहे.अशी माहिती पत्रकार परिषदेत सुजय प्रतिष्ठानचे संस्थापक मा. श्री. सुरेश ग. सकपाळ यांनी दिली. पुणे श्रमिक पत्रकार भवन ला झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. किसन भोसले – (प्रसिद्ध उद्योजक),डॉ. विठ्ठल जाधव (IPS– विशेष पोलीस महानिरीक्षक सेवानिवृत्त), श्री सुनील मोरे,श्री हेमंत सोनवणे,श्री सागर भंडारी,श्री हरिभाऊ सपकाळ,श्री. सुधीर सकपाळ – (संस्थापक, सुजय प्रतिष्ठान – मैत्री रक्ताची), उपस्थित होते. या उपक्रमात नागरिकांसाठी भव्य रक्तदान शिबिर, मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी, अल्पदरात आयुर्वेदिक औषधांचे वितरण तसेच मोफत कांस्यथाळी मसाज यांची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे युवकांसह सर्व नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### मंगेश लोहोर यांची सुवर्णकामगिरी; ‘हेअर ट्रान्सफॉर्मर २०२६’चे विजेतेपद



पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील ‘फ्लाइंग सिझर युनिसेक्स सलून अँड अकॅडमी’चे संचालक आणि आंतरराष्ट्रीय हेअर स्टायलिस्ट मंगेश (यश) लोहोर यांनी थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित प्रतिष्ठित ‘मॅट्रिक्स प्रो – हेअर ट्रान्सफॉर्मर २०२६’ स्पर्धेत विजेतेपद पटकावत पुण्यासह भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ‘एमएचटी मेन्स कलर अँड कट २०२६’ प्रकारातील या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतातील हजारो हेअर स्टायलिस्टनी सहभाग घेतला होता. उपांत्य फेरीत संपूर्ण पुण्यातून केवळ मंगेश लोहोर यांची निवड झाली होती. त्यानंतर अंतिम फेरीत आधुनिक केशरचना, आकर्षक हेअर कलर ट्रान्सफॉर्मेशन आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन करत त्यांनी परीक्षकांची मने जिंकली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले. ‘मॅट्रिक्स प्रोफेशनल’तर्फे आयोजित या स्पर्धेतील विजेत्यांची निवड आलिम हकीम, सॅम जेम्स, विपुल चुडासमा, मेलरॉय डिक्सन आणि बिनायफर पार्डीवाला या नामांकित परीक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आली.



## बालविकास, महिला सक्षमीकरणात प्रत्येकाचे योगदान गरजेचे

- **अमृता देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**
- **ग्रॅव्हिट्स फाउंडेशनतर्फे ऊर्जा पुरस्कारांचे वितरण**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, आहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांसारख्या महिलांनी आपल्या कतृर्त्वाने देशासाठी मोठे योगदान दिले. आजच्या काळातही असे काम करणाऱ्या महिलांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. बालविकास व महिला सक्षमीकरणासाठी केवळ प्रशासन पुरेसे नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन योगदान द्यायला हवे. प्रत्येकाने आपापल्या क्षमतेनुसार महिला, लहान मुले, पर्यावरण, सामाजिक क्षेत्रात काही ना काही चांगले काम करायला हवे, असे प्रतिपादन दिव्यज फाउंडेशनच्या संस्थापिका अमृता देवेंद्र फडणवीस यांनी केले. ग्रॅव्हिट्स फाउंडेशन आयोजित ऊर्जा पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मॅरियट येथे आयोजित कार्यक्रमावेळी ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या संस्थापिका उषा काकडे, डॉ. शां. ब मुजुमदार, सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, लोकमंगल फाऊंडेशनचे विश्वस्त रोहन देशमुख, प्रसिद्ध क्रिकेटपटू तिलक वर्मा, प्रसिद्ध अभिनेते चंकी पांडे, तेलगु चित्रपटसृष्टीतील दिग्दर्शक व्यंकटेश (व्यंकी) कुडुमुला आदी उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांना यंदाचा ‘उर्जा जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संजय गुप्ते (विशेष आरोग्यसेवा), कायनेटिक ग्रीन एनर्जीच्या संस्थापिका सुलज्जा फिरोदिया मोटवानी (उद्योजकता), भारतीय क्रिकेटपटू तिलक वर्मा (क्रीडा), लोकसाहित्य आणि सत्यशोधक चळवळीचे व्यासंगी अभ्यासक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे (साहित्यसेवा), सोलापूर येथील जिव्हाळा मतिमंद संस्थेचे प्रमुख अण्णाराव भिमशंकर राजमाने (शिक्षण व समाजसेवा) यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले.

# गुन्हेगारांचे उदात्तीकरण खपवून घेणार नाही

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांचा ‘सोशल मीडिया’वरही वॉच

- **येरवडा कारागृहाच्या भिंतीजवळ फटाके फोडून आरोपीचा वाढदिवस साजरा करणाऱ्यावर कारवाई**
- **गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलिसांची धडक मोहीम**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुन्हेगारांचे उदात्तीकरण करणारे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात येरवडा पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या आरोपीच्या वाढदिवसानिमित्त कारागृहाच्या संरक्षण भिंतीजवळ फटाके फोडून त्याचे उदात्तीकरण केल्याप्रकरणी एका आरोपीला येरवडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

येरवडा कारागृहासारख्या अतिसंवेदनशील परिसरात कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका गित्ते यांनी घेतली आहे. प्रत्यक्ष रस्त्यावरील गुन्हेगारीबरोबरच समाजमाध्यमांच्या माध्यमातून गुन्हेगारांची प्रतिमा मोठी करण्याचा किंवा त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही येरवडा पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार येरवडा कारागृह परिसरात पोलिसांकडून सतर्क गस्त सुरू होती. ४ ऑगस्ट रोजी तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड आणि त्यांचे पथक गस्त घालत असताना, एका गुन्ह्यात पाहिजे असलेला शंकर बाळासाहेब भालके (वय १९, रा. धनकवडी, पुणे) हा पोस्ट ऑफिस चौकात येणार असल्याची माहिती गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पथकाने तातडीने सापळा रचून भालके याला ताब्यात घेतले.



“गुन्हेगारांचे उदात्तीकरण करणारे व्हिडीओ तयार करणे, प्रसारित करणे किंवा त्याद्वारे समाजात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात येरवडा पोलीस कठोर कायदेशीर कारवाई करतील. समाजमाध्यमांचा वापर गुन्हेगारीचे गौरवीकरण करण्यासाठी होऊ देणार नाही.”

**- उमेश गित्ते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पोलीस ठाणे**

पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या सुलतान सय्यद याच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या मित्रांनी कारागृहाच्या संरक्षण भिंतीलगत फटाके फोडल्याची माहिती समोर आली. फटाके फोडताना वाहतुकीला अडथळा निर्माण करण्यात आला तसेच नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने हा प्रकार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

इतकेच नव्हे, तर या प्रकाराचे चित्रीकरण करून संबंधित व्हिडीओ मित्रांच्या इन्स्टाग्राम खात्यांवर प्रसारित करण्यात आले. कारागृहात असलेल्या आरोपीच्या गुन्हेगारीचे उदात्तीकरण करण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या नेतृत्वाखाली येरवडा पोलिसांनी गुन्हेगारांचे समाजमाध्यमांवरील उदात्तीकरण रोखण्यावर विशेष भर दिला आहे. गुन्हेगारांना प्रोत्साहन देणारे, त्यांच्या समर्थनार्थ व्हिडीओ तयार करणारे अथवा असे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा येरवडा पोलिसांनी दिला आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त चिलुमूला रजनिकांत, सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि पोलीस निरीक्षक केशव दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, पोलीस हवालदार पिलाणे, मुकुंद कोकणे तसेच पोलीस अंमलदार शैलेश वाबळे, बालाजी सोगे, संदीप जायभाये, नटराज सुतार, गणेश पालवे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर आणि सोमनाथ गायकवाड यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



## पुण्यात होणार ‘लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलन’

पुणे (आरंभ पर्व) : पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलना"च्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. प्रज्ञा दया पवार यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. आयोजकांनी केलेल्या नम्र विनंतीला मान देऊन डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारण्यास आपला सहर्ष होकार दिला आहे, अशी माहिती संमेलनाचे संयोजन समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी प्रेस नोटद्वारे प्रसिद्धीस दिली आहे. हे विशेष वैचारिक साहित्य संमेलन आगामी १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर येथे संपन्न होणार आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुरोगामी, विद्रोही आणि कष्टकरी जनतेच्या हक्कांच्या विचारांचा वेध घेणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. संमेलनाचे संयोजन समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यावेळी म्हणाले, "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे 'जग बदल घालूनी घाव, सांगूनी गेले मज भीमराव' हे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. डॉ. प्रज्ञा दया पवार यांचे मराठी साहित्य क्षेत्रातील योगदान आणि त्यांची सामाजिक जाणीव अत्यंत प्रगल्भ आहे. त्यांच्यासारख्या खंबीर आणि ज्येष्ठ विचारवंताचे नेतृत्व या संमेलनाला लाभल्यामुळे या वैचारिक सोहळ्याची उंची आणि समृद्धी अधिक वाढणार आहे."

## सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमुळे तरुणींना करिअरची नवी संधी

पुणे (आरंभ पर्व) : कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा झपाट्याने विस्तार होत असताना या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणींना व्यावहारिक तंत्रज्ञान कौशल्ये आणि प्रत्यक्ष प्रकल्पांचा अनुभव देण्यासाठी ‘सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस’ महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील एक हजारांहून अधिक तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले असून, देशभरात आतापर्यंत २६ हजार ५०० हून अधिक युवक-युवतींना प्रशिक्षण मिळाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विविध उद्योगांमधील कामाचे स्वरूप बदलत असून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे या क्षेत्रासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार करण्याबरोबरच तरुण महिलांना तंत्रज्ञान क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी सक्षम करण्यावर सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसच्या माध्यमातून भर दिला जात आहे. उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण आणि वास्तविक प्रकल्पांवर काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून दिली जाते. नवी मुंबईतील रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची विद्यार्थिनी हिमांशी शर्मा हिच्यासाठी हा कार्यक्रम शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योगातील प्रत्यक्ष काम यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरला. कार्यक्रमातील प्रशिक्षण आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून तिने ‘करिअरस्टॅक एआय’ ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित रेझ्युमे विश्लेषण प्रणाली विकसित केली. नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांना त्यांचे अर्ज अधिक प्रभावी करण्यासाठी ही प्रणाली मदत करते. या अनुभवानंतर हिमांशीला अमेरिकेतील ‘ब्लू सॅफायर’ कंपनीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा तंत्रज्ञान प्रशिक्षणार्थी म्हणून संधी मिळाली. येथे ती ग्राहक-केंद्रित तसेच पेटंटसाठी अर्ज करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये योगदान देत आहे.

## ‘इंडियन डीजे एक्स्पो-२०२६’ : ५०० हून अधिक जागतिक ब्रँड्सचा सहभाग

पुणे (आरंभ पर्व) : मनोरंजन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील प्रतिष्ठित आणि बहुप्रतिक्षित ‘इंडियन डीजे एक्स्पो-२०२६’चे आयोजन १९ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान भारत मंडपम, प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाची ही ११ वी आवृत्ती असून, व्यावसायिक ध्वनी प्रणाली, प्रकाशयोजना, दृकश्राव्य तंत्रज्ञान, वाद्ये, डीजे तंत्रज्ञान, एलईडी डिस्प्ले आणि विशेष दृश्य-ध्वनी प्रभाव क्षेत्रातील देशातील प्रमुख व्यावसायिक व्यासपीठ म्हणून या प्रदर्शनाची ओळख निर्माण झाली आहे. यंदाच्या प्रदर्शनात ५०० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आघाडीचे ब्रँड्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि भविष्याभिमुख तांत्रिक उपायांच्या माध्यमातून भारतातील मनोरंजन आणि सिस्टिम इंटिग्रेशन उद्योगात वेगाने होत असलेल्या बदलांची झलक या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. यंदा ‘प्रो एव्ही सिस्टिम्स इंटिग्रेशन एक्स्पो-२०२६’चेही याच ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. वाढत्या इन्स्टॉलेशन आणि सिस्टिम इंटिग्रेशन बाजारपेठेवर यामध्ये विशेष भर दिला जाणार आहे. कमर्शियल ऑडिओ, इन्स्टॉल्ड साउंड, साउंड रिइन्फोर्समेंट, कॉन्फरन्सिंग प्रणाली, डिजिटल सायनेज, एलईडी डिस्प्ले तंत्रज्ञान आणि इंटेलिजंट लाइटिंगसह विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण येथे होणार आहे.

## सूर्या हॉस्पिटलच्या ह्युमन मिल्क बँकेने उभारला दूधदानाचा उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : चौदा जानेवारी २०२३ रोजी सुरू झाल्यापासून ‘सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे’ येथील ह्युमन मिल्क बँकेने १,१७६ दात्या मातांकडून एकूण १,२०३ लिटर ५३१ मिलिलिटर मातृदूध संकलित केले असून, त्याचा लाभ १,४६४ नवजात बालकांना झाला आहे. ६० लिटर क्षमतेची ही ‘मिल्क बँक’ नवजात अतिदक्षता विभाग (एनआयसीयू), प्रसूती कक्ष, प्रसूतीनंतरचे वॉर्ड आणि प्रसूती सेवा विभागाशी जोडलेली आहे. त्यामुळे नवजात तज्ज्ञ आणि स्तनपान सल्लागारांची टीम वैद्यकीय गरजेनुसार दात्या मातांचे दूध बालकांना उपलब्ध करून देते. या प्रत्येक आकड्यामागे आपल्या अतिरिक्त मातृदुधाचे दान करणारी एक आई आणि जीवनाच्या अत्यंत नाजूक टप्प्यावर त्या दुधाची गरज असलेले एक नवजात बाळ आहे. दात्या मातांचे दूध विशिष्ट वैद्यकीय परिस्थितींमध्ये वापरले जाते. उदाहरणार्थ, प्रसूतिनंतर आईची प्रकृती सुधारत असताना, अकाली किंवा गुंतागुंतीच्या प्रसूतीनंतर दूध उशिरा येत असल्यास, आई आजारी असल्यास, ‘एनआयसीयू’मुळे आई-बाळ काही काळ वेगळे असल्यास किंवा प्रसूतिनंतरच्या सुरुवातीच्या दिवसांत पुरेसे दूध तयार होत नसल्यास अशा वेळी दात्या मातांचे दूध उपयुक्त ठरते. भारतातील ह्युमन मिल्क बँकिंगच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नवजात बालकासाठी आईचे स्वतःचे दूध हा सर्वोत्तम आहार आहे. मात्र, ते उपलब्ध नसल्यास किंवा अपुरे असल्यास पाश्चराइज्ड दात्या मातांचे दूध हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. वैद्यकीय गरजेनुसार फॉर्म्युला दूधही वापरले जाऊ शकते; परंतु उच्च जोखमीच्या नवजात बालकांसाठी दात्या मातांचे दूध अधिक सुरक्षित मानले जाते. हे दूध नाजूक प्रकृतीच्या बालकांना सहज पचते आणि फॉर्म्युला दुधात नसणारे अनेक संरक्षणात्मक फायदे त्यातून मिळतात.

# ३६ देशांतून २७४ फरार आरोपी भारतात

### मोदी सरकारची कारवाई : १७,८७४ कोटींची मालमत्ता जप्त



**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

एकेकाळी आर्थिक गुन्हे करून परदेशात पळून गेलेले आरोपी भारतीय कायद्याच्या आवाक्याबाहेर राहतात, अशी धारणा होती. मात्र, गेल्या काही वर्षांत या चित्रात मोठा बदल झाल्याचा दावा केंद्र सरकारकडून करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली फरार आर्थिक गुन्हेगारांविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यात आली असून, २०१९ पासून आतापर्यंत ३६ देशांतून २७४ फरार आरोपींना भारतात परत आणण्यात आले आहे. तसेच त्यांच्या १७,८७४ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्याचे सांगितले जाते.

केंद्र सरकारच्या मते, या यशामागे एकात्मिक, गुप्तचर माहितीवर आधारित आणि तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करणारी कार्यपद्धती महत्त्वाची ठरली. गृह मंत्रालयाच्या पुढाकाराने केंद्रीय तपास यंत्रणा, राज्य पोलीस, इंटरपोल, परराष्ट्र मंत्रालय आणि परदेशी सरकार यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यात आला. त्यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्येही प्रगती साधता आली.

फरार आरोपींना भारतात परत आणण्याबरोबरच त्यांच्या बेकायदेशीर आणि संशयास्पद मालमत्तांवरही कठोर कारवाई करण्यात आली. १७,८७४ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्यामुळे आर्थिक गुन्ह्यांमधून मिळवलेल्या संपत्तीवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते, हा संदेश अधिक ठळकपणे गेला आहे.

या मोहिमेचा कायदेशीर पाया म्हणजे फरार आर्थिक गुन्हेगार कायदा (Fugitive Economic Offenders Act). या कायद्यांतर्गत मोठ्या आर्थिक गुन्ह्यांतील आरोपींनी परदेशात राहून भारतीय न्यायव्यवस्थेपासून दूर राहू नये, तसेच त्यांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई करून त्यांना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाण्यास भाग पाडण्याची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीच्या काळात फरार आरोपींना भारतात परत आणण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव होता. मात्र, सध्याच्या सरकारने आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्य, प्रभावी कूटनीती आणि संस्थात्मक समन्वयाच्या माध्यमातून या प्रक्रियेला गती दिली.

याचबरोबर अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली भारतपोल (BHARATPOL) या प्लॅटफॉर्मची सुरुवात करण्यात आली. या माध्यमातून १,४०० हून अधिक भारतीय यंत्रणा इंटरपोलशी जोडल्या गेल्या असून, गेल्या तीन वर्षांत ४०१ फरार गुन्हेगारांविरोधात विविध नोटिसा जारी करण्यात आल्याचे सांगितले जाते. या उपक्रमामुळे जागतिक स्तरावरील पोलीस यंत्रणांमधील संपर्क आणि समन्वय अधिक मजबूत झाला.

आर्थिक गुन्ह्यांचा परिणाम केवळ सरकारी महसुलापुरता मर्यादित राहत नाही. बँका, गुंतवणूकदार, कर्मचारी आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा व्यापक परिणाम होतो. त्यामुळे अशा गुन्ह्यांविरोधातील कठोर कारवाईमुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढण्यास मदत झाल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

केंद्र सरकारच्या मते, ३६ देशांतून २७४ फरार आरोपींना भारतात परत आणणे आणि १७,८७४ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करणे ही केवळ प्रशासकीय कामगिरी नसून, भारतीय कायद्याची पोहोच देशाच्या सीमांपलीकडेही प्रभावीपणे वाढल्याचे प्रतीक आहे. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे फरार आरोपींविरोधातील मोहीम सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# आत्महत्येच्या घटनेने परिसरात खळबळ

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात कुरण व बारव येथे आत्महत्या केल्याच्या दोन दुर्दैवी घटना घडल्या. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. जुन्नर पोलीस दोन्ही घटनांचा तपास करत आहेत.

कुरण ता.जुन्नर येथील शेतकरी ज्ञानेश्वर बबन नवले यांच्या शेतात मजुरीसाठी वास्तव्यास असलेले नारायण कडाळे यांची पत्नी उमा नारायण कडाळे (वय २७) यांनी बुधवारी (दि. ५) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरात ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

बारव (ता. जुन्नर) येथे वास्तव्यास असलेले विश्वास दुलाजी निगळे (मूळ रा. हिवरे तर्फे मिन्हेर) यांच्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने मंगळवारी (दि. ४) रात्री राहत्या घरात वरच्या मजल्यावर लोखंडी अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले. त्याचे वडील विश्वास निगळे यांनी जुन्नर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दोन्ही घटनांचा पुढील तपास जुन्नर विभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मोरे पोलिस हवालदार एकनाथ पारधी करत आहेत.

# कारवाईत १३ सराईत गुन्हेगार तडीपार

### नागपूर-अकोला कारागृहात दोन धोकादायक व्यक्ती स्थानबद्ध




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्डवरील एकूण १२ सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असून एम, पी, डी, ए कायद्यांतर्गत दोन धोकादायक व्यक्तींना एका वर्षासाठी नागपूर व अकोला कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही कारवाई केली असल्याचे खेड पोलिसांकडून सांगण्यात आले.

पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्याकडे बारा गुन्हेगारांचे तर उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल मांडवे यांच्याकडे एका गुन्हेगाराच्या तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. हि कारवाई पोलिस निरिक्षक सुभाष चव्हाण यांच्या पथकाने केली. यामध्ये मनोज माणिक हजारे, निखील नवनाथ गोगावले, राकेश पांडुरंग हजारे, गणेश दत्तात्रय गावडे, गौरव राम हजारे ( सर्व रा. कनेरसर, ता. खेड ). रोहन उर्फ जग्गु अशोक शिंदे, सोमनाथ कुंडलिक शिंदे, दिपक दत्तात्रय सावंत, सोमनाथ उर्फ वाळके दत्तात्रय सावंत, अनिल विश्वनाथ सावंत, महेश दत्तात्रय हांडे, नवनाथ नामदेव गिन्हे (सर्व रा. आंबोली, ता. खेड). राजेंद्र उर्फ राजु गेणभाऊ करंडे (रा. करंडेवस्ती, ता. खेड) यास पुणे, अहमदनगर, सातारा जिल्ह्याबाहेर तडीपार केले. प्रविण उर्फ डॉलर सिताराम ओव्हाळ (रा. वाळद, ता. खेड) आणि संकेत सुनिल होले (रा. राक्षेवाडी, ता. खेड) या धोकादायक व्यक्तींना एम.पी. डी.ए नुसार स्थानबद्ध करण्यात आले आहे.

खेड पोलीस स्टेशन हद्दीत कोणी दहशत निर्माण करून नागरिकांना त्रास दिल्यास अशा सराईत गुन्हेगारांवर अशीच कारवाई केली जाणार आहे, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.


## ग्रामपंचायत चिंचोशी, ता. खेड, जि. पुणे

**निविदा सुचना**

**बी -१, खुली निविदा सुचना**

ग्रामपंचायत चिंचोशी, ता. खेड, जि.पुणे यांच्या तर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार सर्वसाधारण (खुला) वर्ग १ ते ७ पर्यंत व जिल्हा परिषद पुणे नोंदणीकृत मजूर संस्था तसेच सुशिक्षीत बेरोजगार अभियंता याजंकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा ठेकेदारांकडून दोन पाकीट पध्दतीने मागवित आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं. कार्यालयामार्फत दि. ०५/०८/२०२६ ते १२/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०: ३० ते संध्याकाळी ०५ : ००) वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येतील. आणि भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. ०५/०८/२०२६ ते १२/०८/२०२६ पर्यंत संध्याकाळी ०५: ०० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालय चिंचोशी, ता.खेड, जि.पुणे येथे स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास दि. १२/०८/२०२६ रोजी संध्याकाळी ०५: १० वाजता उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | कालावधी | ठेकेदाराचा वर्ग | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे चिंचोशी येथे शौचालय युनिट बांधणे. ता. खेड | ३,००,०००/- | २००/- | ६ महिने | सु. बे. अ. | ०० |

टीप : कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा हक्क ग्रा.पं. ने राखुन ठेवला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत चिंचोशी, ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत चिंचोशी, ता. खेड, जि. पुणे







## थोडक्यात पण महत्वाचे



### AM/NS इंडिया स्टीलची ताकद; INS मालवण दाखल

पुणे (आरंभ पर्व) : आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया)ने भारतीय नौदलात नव्याने दाखल झालेल्या स्वदेशी बनावटीच्या INS मालवण या पाणबुडीविरोधी युद्धनौकेच्या बांधणीसाठी लागणाऱ्या १०० टक्के विशेष नौदल दर्जाच्या पोलादाचा पुरवठा केला आहे. हे पोलाद कंपनीच्या गुजरातमधील हझिरा प्रकल्पात तयार करण्यात आले आहे. कोचिन शिपयार्डने बांधलेली INS मालवण ही आठ माहे-वर्गीय पाणबुडीविरोधी युद्धनौकांपैकी दुसरी युद्धनौका आहे. तिच्यामध्ये ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी घटकांचा वापर करण्यात आला आहे. पाणबुडीविरोधी युद्ध, पाण्याखालील देखरेख आणि किनारी सुरक्षेसाठी ही युद्धनौका महत्त्वाची ठरणार आहे. AM/NS इंडिया भारतीय नौदलासाठी बांधण्यात येणाऱ्या आठ युद्धनौकांसाठी आवश्यक विशेष पोलादाचा पुरवठा करत असून, यापूर्वी INS विशाखापट्टणम आणि INS सुरत या युद्धनौकांसाठीही कंपनीने विशेष पोलाद पुरवले आहे.

### भारती एअरटेलची २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत दमदार कामगिरी

गुरुग्राम (आरंभ पर्व) : भारती एअरटेल लिमिटेडने 30 जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षित एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीत भारती एअरटेलने दमदार कामगिरी करत 1.49 कोटी नवीन ग्राहक जोडले आणि 15 देशांतील एकूण ग्राहकसंख्या 68.1 कोटींवर पोहोचली. कंपनीचा एकत्रित महसूल 18.4 टक्क्यांनी वाढून 58,539 कोटी रुपये झाला, तर भारतातील महसूल 41,214 कोटी रुपये झाला. मोबाईल ग्राहकांकडून मिळणारे सरासरी उत्पन्न (ARPU) 250 रुपयांवरून 264 रुपयांवर वाढले. पोस्टपेड विभागात विक्रमी 10 लाख नवीन ग्राहक जोडले गेले, तर होम ब्रॉडबँड, एअरटेल बिझनेस आणि आफ्रिका व्यवसायातही चांगली वाढ झाली. या तिमाहीत एअरटेलने 5G तंत्रज्ञानावर आधारित पोस्टपेड फास्ट लेन सेवा, उद्योगांसाठी एअरटेल सिक्योर वर्कफोर्स सुरक्षा प्लॅटफॉर्म सुरू केला तसेच देशभरात नवीन टॉवर्स आणि फायबर नेटवर्कचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला.

### बचत खात्यांच्या श्रृंखलेत वाढ

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे दोन नवीन सेव्हिंग्ज अकाऊंट्सची सुरुवात केल्याची घोषणा केली. 'मॅक्स फॉर सिनियर्स' आणि 'मॅक्स फॉर हर' अशी ही दोन उत्पादने असून याचा लाभ अनुक्रमे वरिष्ठ नागरिक आणि महिलांसाठी होणार आहे. विशिष्ट विभागांसाठी ही उत्पादने त्यांच्या महत्त्व पूर्ण अशा सेव्हिंग्ज मॅक्स श्रेणीतील असून ही श्रेणी प्रेफर्ड एन्ट्री लेव्हल सेव्हिंग्ज अकाऊंट्स पैकी असतील. नुकत्याची पीआयबीच्या रिपोर्ट नुसार भारतातील वरिष्ठ नागरिकांची लोकसंख्या ही २०३६ पर्यंत २३० दशलक्षांवर पोहोचणार आहे, म्हणजेच संपूर्ण लोकसंख्येच्या १५ टक्के ही आकडेवारी असेल. त्याच बरोबर सध्या महिला या एकूण बँक अकाऊंट्स पैकी ३९.२ टक्के खातेधारक आहेत, ही आकडेवारी एकूण ठेवींच्या ३९.७ टक्के आहे. मॅक्स फॉर सिनियर्स आणि मॅक्स फॉर हर चे डिझाईन हे या विभागातील ग्राहकांच्या सातत्याने बदलत्या गरजा पूर्ण करण्यासह क्षेत्रातील पहिले वैशिष्ट्य जसे सायबर फ्रॉड कव्हर, १ लाख रुपयांपर्यंत हॉस्पिटलायझेशन कव्हर आणि अन्य सुविधा यामध्ये देण्यात येत आहेत.

### सीएसआरचे अस्तित्व १०.७७ कोटी लोकांपर्यंत पोहोचले

मुंबई (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँक या भारतातील खाजगी क्षेत्रातील सर्वांत मोठ्या बँकेच्या सीएसआर उपक्रमामुळे १०.७७ कोटी लोकांवर परिणाम झाला आहे. परिवर्तन हा त्यांचा सीएसआर उपक्रमांचा ब्रॅन्ड असून हा ब्रॅन्ड आता भारतातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पोहोचला आहे. बँक सध्या एनजीओ पार्टनर्स, स्थानिक प्रशासन आणि सामाजिक संस्था बरोबर काम करुन स्थानिक स्तरावरील गरजेच्या, दीर्घकालीन शाश्वत परिणाम घडवण्यासाठी योग्य पध्दतीने सहकार्य करत आहे. बँके तर्फे ही घोषणा करण्यात आली की त्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमा अंतर्गत त्यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु १,३१६.१८ कोटी रुपये खर्च केले असून याची घोषणा या वर्षीच्या एकत्रित वार्षिक अहवालात त्यांनी केली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ रु २४८ कोटींची असून सर्वसमावेशक सीएसआर मधील गुंतवणूक त्यांच्या परिवर्तन या कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून त्यांनी अंदाजे ७,४९२ कोटी रुपयांची आहे.

### स्मार्टफोन सुरक्षेसाठी एआय+ची ₹१०० कोटींची गुंतवणूक




पुणे (आरंभ पर्व) : भारतीय स्मार्टफोन क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल टाकत एआय+ स्मार्टफोन्सने 'प्रोजेक्ट ट्रस्ट+' या नव्या उपक्रमाची घोषणा केली आहे. पुढील पाच वर्षांत दरवर्षी ₹२० कोटी, अशा एकूण ₹१०० कोटींची गुंतवणूक करून देशातील सर्वात सुरक्षित स्मार्टफोन इकोसिस्टम उभारण्याचा कंपनीचा मानस आहे. या उपक्रमांतर्गत एथिकल हॅकर्स, सुरक्षा संशोधक आणि डेव्हलपर्स यांना कंपनीच्या प्रणालींची चाचणी घेण्यासाठी, सुरक्षा त्रुटी शोधण्यासाठी आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्या दूर करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कंपनीच्या मते, 'प्रोजेक्ट ट्रस्ट+' ही केवळ बग बाऊंटी योजना नसून पारदर्शकता, सहयोग आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांवर आधारित व्यापक सुरक्षा उपक्रम आहे.

# ७ ऑगस्टला मोफत शस्त्रक्रिया शिबिर

## जन्मतः ओठ आणि टाळूचे व्यंग असणाऱ्या बालकांसाठी विशेष उपक्रम



- शिबिराचे ठिकाण - पुनर्रचनात्मक (प्लास्टिक) शल्यचिकित्सा विभाग, बाह्यरुग्ण OPD क्र. 5 A, पहिला मजला, डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे
- नोंदणीसाठी संपर्क क्रमांक: +91 70444 24477

**पिंपरी, पुणे (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र येथे जन्मतः दुभंगलेले व फाटलेले ओठ तसेच टाळू या व्यंगाने ग्रस्त बालकांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शुक्रवार, दि. 7 ऑगस्ट 2026 रोजी "मिशन स्माईल आणि कोटक महिंद्रा" यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे. हे शिबिर डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या हाय-टेक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील पुनर्रचनात्मक (प्लास्टिक) शल्यचिकित्सा विभागातील बाह्यरुग्ण विभाग, OPD क्र. 5 A येथे सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत होणार आहे. जन्मतः दुभंगलेले व फाटलेले ओठ तसेच टाळू असलेल्या बालकांना योग्य उपचार मिळावेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शिबिरात तपासणी झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी आंतररुग्ण विभागात दाखल केले जाईल. तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्व प्रयोगशाळा चाचण्या, शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतरची काळजी आणि आवश्यक औषधे या सर्व सेवा पूर्णपणे मोफत पुरवण्यात येणार आहेत. याशिवाय, रुग्ण आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या एका नातेवाईकाच्या राहण्याची व जेवणाचीही मोफत सोय करण्यात आल्यामुळे गरजू कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. फाटलेले ओठ व टाळू यांसारख्या व्यंगांमुळे अनेक बालकांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा बालकांना नवसंजीवनी देत त्यांचे आरोग्य सुधारावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर विश्वासपूर्ण हास्य फुलावे, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाविषयी भाष्य करताना डॉ.सौ. भाग्यश्रीताई पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी वाय पाटील विद्यापीठ, (अभिमत विद्यापीठ) पिंपरी, पुणे, म्हणाल्या, "प्रत्येक बालकाला सन्मानाने, आत्मविश्वासाने आणि निरोगी हास्यासह जीवन जगण्याची संधी मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. या मोफत ओठ व टाळू फाटणे (क्लेफ्ट लिप अँड पॅलेट) शस्त्रक्रिया शिबिराच्या माध्यमातून गरजू बालकांपर्यंत अत्याधुनिक वैद्यकीय उपचार पोहोचविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. अशा प्रकारचे उपक्रम हे आमच्या संस्थेच्या संवेदनशील आरोग्यसेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाप्रती असलेल्या दृढ बांधिलकीचे प्रतीक आहेत. आर्थिक अडचणींमुळे कोणतेही बालक आवश्यक उपचारांपासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत."



## वनविभागामार्फत स्थानिक प्रजातींच्या वृक्ष लागवड उपक्रम

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील मौजे धानोरी, ता. हवेली जि. पुणे येथील राखीव वनक्षेत्र सर्व्हे नंबर ६९ मध्ये अटल घन वृक्ष लागवड (मियावाकी) रोपवन क्षेत्रामध्ये पर्यावरण संवर्धन आणि हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने स्थानिक प्रजातींच्या वृक्ष लागड उपक्रम आमदार बाप्पूसाहेब पठारे तसेच स्थानिक इतर आजी-माजी पदाधिकारी यांचे उपस्थित वनसंरक्षक (पुणे वनवृत्त) आशिष ठाकरे व उपवनसंरक्षक पुणे अभिजीत वायकोस, विभागीय वनाधिकारी (दक्षता) अमोल थोरात तसेच सहाय्यक वनसंरक्षक पुणे विशाल चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली व वनपरिक्षेत्र अधिकारी नंदकिशोर पाटील पुणे तसेच शितल खंडके, वनपाल हडपसर व वनरक्षक एस. बी. गायकवाड, प्रिया आकेन व वनसेवक लक्ष्मण टिंगरे अधिनस्त वनपाल / वनरक्षक यांचे नियोजीत पथकाने स्थानिक प्रजातींच्या वृक्षरोपणाची अंमलबजावणी केली.

## सनकाइंड इंडियाला सौर ऊर्जा प्रकल्पांच्या ऑर्डर्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एकात्मिक नवीकरणीय ऊर्जा ईपीसी आणि स्वच्छ ऊर्जा उपाय पुरवणाऱ्या सनकाइंड इंडिया लिमिटेडला आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मोठे यश मिळाले आहे. कंपनीला जुलै २०२६ पर्यंत सुमारे २५० मेगावॅट क्षमतेच्या वितरित मुक्त प्रवेश (डिस्ट्रीब्युटेड ओपन ॲक्सेस) सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अनेक ईपीसी ऑर्डर्स प्राप्त झाल्या आहेत. हे प्रकल्प छत्तीसगड, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये उभारले जाणार असून, स्टील, पॅकेजिंग, उत्पादन उद्योग तसेच स्वतंत्र वीज उत्पादक क्षेत्रातील व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांसाठी ते राबवले जाणार आहेत. या ऑर्डर्समुळे कंपनीचे ऑर्डर बुक आणि देशभरातील अंमलबजावणीची क्षमता अधिक बळकट झाली आहे. कंपनीच्या मते, या ऑर्डर्समुळे व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांमध्ये ऊर्जा खर्च कमी करणे, ऊर्जा सुरक्षितता वाढवणे आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वितरित मुक्त प्रवेश सौर ऊर्जेचा स्वीकार वेगाने वाढत असल्याचे स्पष्ट होते.

# दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये संताप

## काँग्रेस तालुकाध्यक्ष शंकर नलावडे यांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजगड तालुक्यातील निगडे मोसे गावात गेल्या काही दिवसांपासून नळाद्वारे अत्यंत गढूळ व दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येबाबत राजगड (वेल्हे) तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकर रोहिदास नलावडे यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी (BDO) यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनात



नलावडे यांनी म्हटले आहे की, गावातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून नळाद्वारे गढूळ, दूषित व आरोग्यास अपायकारक पाणी मिळत आहे. हे पाणी पिण्यास अयोग्य असून त्यामुळे उलट्या, जुलाब (डायरिया) तसेच इतर जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची तातडीने पाहणी करून दूषित पाण्याचा स्रोत शोधावा, आवश्यक दुरुस्ती व स्वच्छतेची कामे त्वरित पूर्ण करावीत तसेच गावकऱ्यांना शुद्ध, स्वच्छ व पिण्यायोग्य पाण्याचा नियमित पुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता तातडीने कारवाई करून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, अन्यथा ग्रामस्थांसह लोकप्रतिनिधींना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही शंकर रोहिदास नलावडे यांनी दिला आहे.




## एसुसने भारतात 'क्रोमबुक सीएक्स15' लाँच केला

- एआय-सक्षम लॅपटॉपची किंमत ₹47,990
- विद्यार्थी, युवा व्यावसायिक आणि प्रथमच लॅपटॉप खरेदी करणाऱ्यांसाठी आकर्षक पर्याय; क्रोमओएस आणि गुगल एआय सुविधांनी सज्ज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तैवानची आघाडीची तंत्रज्ञान कंपनी एसुसने भारतातील आपल्या क्रोमबुक उत्पादन श्रेणीचा विस्तार करत नवीन एसुस क्रोमबुक सीएक्स15 (सीएक्स1505सीटीए) सादर केला आहे. विद्यार्थी, युवा व्यावसायिक आणि प्रथमच लॅपटॉप खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या लॅपटॉपमध्ये क्रोमओएस, गुगल एआय आणि सुरक्षित क्लाउड-आधारित संगणकीय अनुभवाची सुविधा देण्यात आली आहे.

या लॅपटॉपची किंमत ₹47,990 असून तो एसुस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, आरओजी स्टोअर्स, अधिकृत विक्रेते, रिलायन्स डिजिटल, एसुस ई-शॉप आणि देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध असेल. क्रोमओएसवर आधारित असलेला एसुस क्रोमबुक सीएक्स15 हा हलक्या आणि मजबूत डिझाइनसह विश्वासार्ह कार्यक्षमता, स्मार्ट उत्पादकता, दर्जेदार मनोरंजन आणि एंटरप्राइझ-स्तरीय सुरक्षा प्रदान करतो. गुगलच्या परिसंस्थेशी सहज जोडणीमुळे संशोधन, ऑनलाइन शिक्षण, सादरीकरणे तयार करणे आणि टीमसोबत सहयोग करणे यांसारखी दैनंदिन कामे अधिक सुलभ होतात. या लॅपटॉपमध्ये गुगलच्या नव्या एआय सुविधांचा समावेश करण्यात आला असून, वापरकर्त्यांना अधिक कार्यक्षमतेने काम करण्याबरोबरच भविष्यातील गरजांसाठी उपयुक्त एआय कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते. खरेदी अधिक सुलभ करण्यासाठी एसुस इझी पे अंतर्गत शून्य टक्के व्याजदरासह दरमहा ₹3,999 पासून ईएमआयची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडचा आयपीओ ७ ऑगस्ट २०२६ पासून खुला होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कंपनी टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडने जाहीर केले की, या कंपनीचा प्रारंभिक समभाग विक्री प्रस्ताव (आयपीओ) शुक्रवार,७ ऑगस्ट पासून सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार आहे. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली लावण्याची तारीख गुरुवार,६ ऑगस्ट असून, हा इश्यू मंगळवार,११ ऑगस्ट २०२६ रोजी बंद होणार आहे. कंपनीला या इश्यूमधून प्राइस बँडच्या कमाल रु.२५१.८८ कोटी निधी उभारण्याची अपेक्षा असून, बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध होण्याचा कंपनीचा मानस आहे. या इश्यूसाठी प्रति शेअर रु.२०० ते रु.२१२ असा प्राइस बँड निश्चित करण्यात आला आहे. किमान ७० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ७० च्या पटीत बोली लावता येणार आहे. खंबाटा सिक्युरिटीज लिमिटेड ही या इश्यूची बुक रनिंग लीड मॅनेजर असून, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ही रजिस्ट्रार म्हणून काम पाहणार आहे.

## क्लिअरट्रिपकडून बस २.० लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्लिअरट्रिप या फ्लिपकार्टच्या कंपनीने आज बस २.० लाँच केले आहे. हा प्लॅटफॉर्म मोठ्या प्रमाणावर विस्तारित रस्ते प्रवास अनुभव आहे, जो प्रवाशांना ६,००० हून अधिक शहरांमधील ६.५ लाखांपेक्षा जास्त मार्गांशी जोडतो, ज्यामध्ये विमान आणि रेल्वे नेटवर्कच्या पोहोच पलीकडील गंतव्यस्थानांचाही समावेश आहे. अधिक खोलवर नेटवर्क पोहोच, सर्वोत्तम बुकिंग प्रवास आणि देशातील सर्वात मोठ्या रस्ते प्रवास इन्व्हेंटरीची उपलब्धता यांसह बस २.० प्रवाशांना एकाच प्लॅटफॉर्मवर फ्लाइट्स, रेल्वे आणि हॉटेल्ससह विनासायासपणे बस बुक करण्यास सक्षम करते. ही श्रेणी जेन झेड प्रवाशांसाठी महत्त्वाचा संपर्क बिंदू म्हणून उदयास आली आहे. आज, क्लिअरट्रिपवरील ५५ टक्क्यांहून अधिक बस बुकिंग जेन झेड प्रवाशांकडून येतात. विद्यार्थी, एकटे प्रवास करणारे आणि नवीन नोकरीला लागलेले व्यावसायिक परवडणाऱ्या वीकेंड गेटवेसाठी, घरी जाण्याच्या प्रवासासाठी आणि अचानक आलेल्या प्रवासासाठी वाढत्या प्रमाणात बस प्रवासाला प्राधान्य देत आहेत.

## सोनालिकाने ११,४४२ ट्रॅक्टर्सची आजवरच्या सर्वोत्तम एकंदर विक्रीची नोंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने आर्थिक वर्ष २०२७ मधील आपली दमदार कामगिरी कायम ठेवली असून, जुलै महिन्यात एकंदर ११,४४२ ट्रॅक्टर्सची विक्री नोंदवत आजवरची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. उद्योगातील अग्रगण्य अशा देशांतर्गत २७.२ टक्के वाढीमुळे हे शक्य झाले असून कंपनीने देशांतर्गत उद्योगाच्या कामगिरीला १.३ पटीने मागे टाकले आहे. शेतकऱ्यांसाठी वैयक्तिकरीत्या तयार केलेल्या उत्पादनांमुळे ही कंपनी देशांतर्गत



बाजारपेठेत सर्वाधिक बाजारहिस्सा मिळवणारी कंपनी बनली आहे. या विक्रमी कामगिरीने सोनालिकाच्या 'ग्राहक प्रथम' या धोरणाला प्रत्यक्षात उतरवण्याच्या क्षमतेवर शिक्कामोर्तब केले आहे. हे धोरण नाविन्य, कार्यवाहीतील उत्कृष्टता आणि शेतीच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्तम मूल्य प्रदान करण्यावर आधारित आहे. पुन्हा सुरू झालेला मान्सून आणि खरीप पेरणीतील प्रगती सुरू असतानाच शेतकरी आगामी हंगामासाठी सक्रिय पावले उचलत आहेत. अशा वेळेस कमी कालावधीत उत्पादकता वाढवण्यासाठी उच्च अश्वशक्तीच्या (HP) ट्रॅक्टर्सकडे स्पष्ट कल दिसून येत आहे. सोनालिकाचा संपूर्ण उत्पादन पोर्टफोलिओ शेतकऱ्यांना त्यांच्या भरभराटीसाठी आवश्यक असलेली कार्यक्षमता, विश्वसनीयता आणि तंत्रज्ञान देऊन सक्षम करण्यासाठीच तयार करण्यात आला आहे. या विक्रमी कामगिरीविषयी बोलताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले,जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टर्सकडे मागणी हळूहळू वाढत असल्यामुळे, आज शेतकरी त्यांच्या भविष्याच्या सुरक्षिततेसाठी कार्यक्षम, विश्वासार्ह कामगिरी करणाऱ्या आणि अधिक उत्पादकतेची हमी देणाऱ्या ट्रॅक्टर्समध्ये मोठी गुंतवणूक करत आहेत.

आगामी सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आमची उत्पादने पूर्णपणे सज्ज असतील, हे सुनिश्चित करण्यावर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे.

# पूरग्रस्त भागांची उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या पुढाकाराने पाहणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील मुळा-मुठा नदीलगत दरवर्षी पूरस्थिती निर्माण होणाऱ्या भागांची आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीचे नियोजन पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह पूरग्रस्त भागांची पाहणी केली.

हॅरिस ब्रिज परिसर, आदर्श नगर, स्मशानभूमी परिसर, बोपोडी सबवे आणि चंद्रमणी नगर या भूयांमध्ये दरवर्षी पूरस्थिती निर्माण होत असल्याने सुमारे ७०० नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे लागते. या पार्श्वभूमीवर पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नदी सुधार प्रकल्पासह विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

पाहणीनंतर आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नदी सुधार प्रकल्पाची कामे तातडीने सुरू करण्याचे तसेच पूरनियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्याचे निर्देश दिले. या कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी आयुक्तांच्या दालनात विशेष बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.